# प्रेस नोट

## ''भंडारा जिल्हा वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह
## क्रिकेट स्पर्धा''

जा.क्र. २९३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– ०७/०६/२०१८

**भंडारा**: वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह (दिनांक ०३/०६/२०१८ ते ०८/०६/२०१८) भंडारा जिल्हा पोलीस दलाचे वतीने शासनाच्या विवीध योजने बाबत जागरुकता निर्माण करण्याकरीता आज दिनांक ०७/०६/२०१८ चे ०६.०० ते ११.०० वाजता पर्यत पोलीस चैतन्य ग्रॉऊन्ड येथे पोलीस विभाग भंडारा यांचे संयुक्त विद्यमाने मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांचे प्रमुख उपस्थितीत क्रिकेट स्पर्धेचे टॉस टाकुन क्रिकेटची सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये चार टिम निवडण्यात आले १) पोलीस अधिकारी टिम २) पोलीस बाईज ३) पोलीस मुख्यालय ४) पोलीस स्टेशन कर्मचारी टिम इत्यादी निवड करण्यात आली.

क्रिकेट सामन्यात चमु टिमची निवड करण्यात आली. ४ टिमचे क्रिकेट सामने झाले. ज्यात पोलीस बाईज टिम ही अंतीम सामन्यात विजयी झाली, असुन प्रतिस्पर्धी टिम पोलीस मुख्यालय उपविजेती झाली आहे. तसेच बेस्ट बॉलर पोलीस बाईज स्वप्नील निजाम व बेस्ट बॅट्समन पोलीस शिपाई अनिल सांबळे यांना मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू, यांनी पारितोषीक(शिल्ड) देवुन शुभेच्छा दिल्या.

क्रिकेट स्पर्धा उपक्रमा दरम्यान प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) पोनि. मंडलवार, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी टिक्कस, पोनि. पिपरेवार, पोनि. चव्हान, सपोनि. पोटे, सपोनि. काळे स्थागुशा भंडारा, सपोनि. क्रिष्णा हत्तीमारे जिवीशा भंडारा, सपोनि. वर्मा साकोली हे उपस्थित होते. सनी फ्रान्सीस यांनी क्रिकेटचे समलोचन केले. प्रकाश सिंग – एम्पायर, त्याचे सोबतीला मनोज बडवाईक, मयंक भगत, हितेश शेळमाके हे हजर होते. पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक प्रधान, पोउपनि. आडोळे, यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. तसेच कार्यक्रमाला पोलीस अधिकारी/ कर्मचारी व पोलीस कुटुंबीयांचा बहुसंख्येने सहभाग होता.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.